# प्रेसनोट

## होमगार्ड नागपूर येथील परिमंडळ अधिकारी यांचेविरूध्द **A.C.B.** नागपूर पथकाने केली कारवाई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नागपूर येथे तक्रारदार यांनी समक्ष येवून तक्रार नोंद केली की, तक्रारदार हे होमगार्ड सैनिक असून मागील २० वर्षापासून होमगार्ड मध्ये कार्यरत आहे. तक्रारदार यांची परेड ची हजेरी कमी असल्याचे सांगून होमगार्ड मधून काढण्यात आले होते, त्यांना २०२६ मध्ये होमगार्ड मध्ये परत घेण्यात आले. तक्रारदार यांची वरिष्ठ अधिकाऱ्यांना शिफारस करून परत होमगार्ड मध्ये लावून दिले त्याचा मोबदला ईलोसे श्री प्रदीप विजय नागपूरे, परिमंडळ अधिकारी, झोन क्र. ५, नागपूर होमगार्ड यांनी तक्रारदार यांना ३०,०००/-रू. लाचेची मागणी करित असल्याची तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने सापळा अधिकारी यांनी लाचेच्या मागणीबाबत पडताळणी कार्यवाही केली असता दिनांक २६/०५/२०२६ रोजी व दिनांक २८/०५/२०२६ रोजी ईलोसे श्री प्रदीप विजय नागपूरे, परिमंडळ अधिकारी, झोन क्र. ५, नागपूर होमगार्ड यांनी तक्रारदार यांस वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे शिफारस करून परत होमगार्ड मध्ये घेतले याचा मोबदला म्हणून ३०,०००/-रू लाचेची मागणी करून स्विकारण्याची तयारी दर्शविली. तद्नंतर ईलोसे श्री प्रदीप विजय नागपूरे, परिमंडळ अधिकारी, झोन क्र. ५, नागपूर होमगार्ड यांना तक्रारदार यांचेवर संशय आल्याने त्यांनी लाच रक्कम स्विकारलेली नाही. त्यावरून आज दिनांक २९/०६/२०२६ रोजी ईलोसे श्री प्रदीप विजय नागपूरे, परिमंडळ अधिकारी, झोन क्र. ५, नागपूर होमगार्ड यांना ताब्यात घेण्यात आले असून पोलीस स्टेशन लकडगंज, नागपूर शहर येथे लाचेच्या मागणीबाबत गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कारवाई ही डॉ. दिगंबर प्रधान, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर, श्रीमती माधुरी बाविस्कर, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर, श्री. विजय माहुलकर, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक श्रीमती भारती गुरनुले यांचे पर्यवेक्षणात सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री मयुर चौरसिया, सापळा पथक मपोहवा कांचन गुलबासे, पोशि सचिन किन्हेकर, विकेश राउत चालक मपोशि प्रिया नेवरे यांनी केलेली आहे.

नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर या जिल्हयांतील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसम (ऐजंट) यांनी कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशिर शासकीय शुल्का व्यतिरिक्त लाचेची मागणी करीत असल्यास तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर येथील खालील क्रमांकावर संपर्क साधावा. तक्रारदारांच्या तक्रारीवर तातडीने कारवाई करण्यात येईल व तक्रारदार यांचे सापळा कारवाईत वापरण्यात आलेली रक्कम ही १ महिण्याचे आत परत केल्या जाईल. तसेच तक्रारदारांचे शासकीय विभागात अडकलेले वैध कामही पुर्ण करून दिले जाईल.

**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथे खालील क्रमांकावर संपर्क साधावा**

**१.** पोलीस अधीक्षक कार्यालय दुरध्वणी क्र. ०७१२-२५६१५२०,
**२.** टोल फ्री क्रमांक : १०६४, व्हॉट्सॲप क्र. ९०६७६७१०६४
**३.** डॉ. दिगंबर प्रधान, पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ९९२३१८५५६६
**४.** श्रीमती माधुरी बाविस्कर, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ७०३८४३६४४१
**५.** श्री. विजय माहुलकर, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ९९२३१४२५६९
**६.** श्री. राजीव कर्मलवार ,वाचक पोलीस निरीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ९०२१४५२७६०